REGISTERED No. B. 3434

डोंगरे यांच्या बालामृताने अशक्त मुलें सशक्त होतात

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख ४ ऑगस्ट, १९४८ अंक ३१


## दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि.

हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

एकूण खेळतें भांडवल : १,५०,००,००० रु. वर
वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : ११,००,०००रु.वर

★ बँक स्ट्रीटवर ★

३,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत

**स्थानिक शाखा :** १ दादर, २ गिरगांव, ३ सँटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शींव, ७ विलेपार्ले.

**इतर शाखा :** ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ क्रॅडांक टाऊन ( सी. पी. ), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव ( पंजाब ), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिताबर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर ( पुणें ), ४६ शहापूर ( बेळगांव ) ४७ नामपूर ( नाशिक ).

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

भागीदारांची संख्या २,२०० वर. ठेवीदारांची संख्या ५०,००० वर.

डी. एन. गांडेकर,
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर, पुणें शाखा.
( बुधवार चौक )

डी. डी. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

फोन नं. ४८३ | तारेचा पत्ता " Cencobank " | पोस्टबॉक्स नं. ५११

मुख्य कचेरीः–लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

–: शाखा :–

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें




माणिक नं. 20
कपड्याकरितां उत्तम साबण
माणिक सोप वर्क्स
...कराड, (सातारा)...

वर्कशॉप मशिनरी (२)
हेवी ड्यूटी
शिमोगा लेथ
(८'—१०")
संपूर्ण देशी, पहिल्या प्रतीचा, तज्ज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत् साधनांनीं बनविलेला
— चौकशी स्थान —
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.

## विविध माहिती

**संपूर्ण पोलादाचा रेल्वेचा डबा**—बंगलोर येथील हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट कंपनीनें संपूर्णपणें पोलादाचा असा एक रेल्वेचा तिसऱ्या वर्गाचा डबा तयार केला आहे. हा डबा आधुनिक पद्धतीचा असून, अशा प्रकारचे डबे लवकरच हिंदुस्थानांतील रेल्वेरस्त्यावर वापरण्यांत येणार आहेत असें समजतें.

**ब्रिटिश उद्योगधंद्यांची पुनर्घटना**—ब्रिटनच्या उद्योगधंद्यांची पुनर्घटना व सुधारणा करण्यासाठी इंग्लंडनें व अमेरिकेनें एक संयुक्त सल्लागार मंडळ स्थापन करण्याचें ठरविलें असल्याचें सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं जाहीर केलें आहे. युरोपला द्यावयाच्या मार्शल योजनेंतील मदतीचे प्रमुख मि. हॉफमन ह्यांच्याशी वाटाघाटी करूनच हा निर्णय घेण्यांत आला आहे. ह्या संयुक्त मंडळांत कारखानदारांचे व कामगार-संघटनांचे उभय देशांतील प्रतिनिधी असतील.

**आइसलंडला अमेरिकेचें कर्ज**—आइसलंडच्या सरकारनें अमेरिकेकडून २३ लाख डॉलर्सचें कर्ज घेतलें आहे. ह्या कर्जाच्या करारावर उभयपक्षीं नुकत्याच सह्या झाल्या. हीं कर्जाची रकम हेरिंग जातीच्या माशाचें तेल काढणाऱ्या यंत्रसामुग्रीची खरेदी करण्यासाठी खर्ची पडावयाची आहे. हेरिंग माशाच्या तेलापासून उत्पन्न होऊं शकणारे इतरही पदार्थ अमेरिकन यंत्रसामुग्रीच्या साह्यानें आइसलंडमध्यें तयार करण्यांत येणार आहेत.

**मध्य प्रांतांतील रस्ते**—रस्त्यांची सुधारणा व वाढ, मोटारीवरील कर, वाहतुकीवरील नियंत्रण, इत्यादि प्रश्नांचा विचार करून सल्ला देण्यासाठी मध्यप्रांत सरकारनें १६ सभासदांचें एक बोर्ड नेमलें आहे. बोर्डावर मोटारच्या धंदेवाल्यांचे प्रतिनिधी आणि इंडिअन रोड्स अँड ट्रॅन्सपोर्ट डेव्हलपमेंट असोसिएशन ह्या संस्थेचेहि प्रतिनिधी घेण्यांत आले आहेत. अध्यक्ष, मध्यप्रांताचे पब्लिक वर्क्स खात्याचे मंत्री आहेत.

**सहकारी खरेदी-विक्री**—बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटीची सातवी वार्षिक साधारण सभा नुकतीच झाली. त्या प्रसंगीं अध्यक्ष ह्या नात्यानें भाषण करतांना दि. ब. एच्. एल. काजी म्हणाले कीं, इतर कोठल्याही क्षेत्रापेक्षा सहकारी पद्धतीनें विक्री करणाऱ्या संस्थांवर देशांतील सहकारी संस्थांचें भवितव्य अवलंबून आहे, ह्या गोष्टीची जाणीव आतां अधिकाधिक होत आहे. मुंबई प्रांतांत अशा प्रकारच्या संस्था उभारण्यांत ही संस्था प्रामुख्यानें भाग घेईल अशी आशा त्यांनीं व्यक्त केली.

**शेतकऱ्यांना कर परत देणार**—मुंबई प्रांतांतील ज्या शेतकऱ्यांनीं लोखंडी व पोलादी शेतकीच्या अवजारावर व हत्यारावर विक्रीकर दिला असेल त्यांना तो परत करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. त्यासाठी १ लाख, ३४ हजार रुपयांची रकम मंजूर करण्यांत आली आहे.

**ओरिसांतील कोळसा**—मध्यप्रांत आणि ओरिसा ह्या प्रांतांतून कमी प्रतीचा कोळसा मुबलक सांपडतो. ह्या कोळशाचा उपयोग कसा करून घेतां येईल ह्यासंबंधीं विचार करण्याकरतां हिंदुस्थान सरकारनें ता. ३० व ३१ जुलैला एक परिषद् नवी दिल्ली येथें भरविली होती.

**निर्वासितांना कर्जें**—पाकिस्तानांतून आलेल्या निर्वासितांना स्थिरस्थावर करण्यासाठी मुंबई सरकारनें मदत कर्जें देण्यास सुरवात केली आहे. आतांपर्यंत सुमारें २ लाख रुपये ह्या योजनेप्रमाणें कर्जाऊ देण्यांत आले आहेत. प्रांतिक सरकारें आणि मध्यवर्ती सरकार ह्यांच्यांत ह्या बाबतींत असें ठरलें आहे कीं, ५०० रुपयांपर्यंतचे मदतीचे अर्ज प्रांतिक सरकारनें निकालांत काढावे; त्या रकमेच्या पुढील अर्ज करणाऱ्या निर्वासितांनीं आपले अर्ज रिहॅबिलिटेशन फायनान्स बोर्ड, हिंदुस्थान सरकार ह्या संस्थेकडे पाठवावयाचे आहेत. ह्या बोर्डाला ५० हजार रुपयांपर्यंत कर्जें मंजूर करण्याचा अधिकार आहे.

**पोलादाच्या धंद्याचा विस्तार**—टाटा आयर्न अँड स्टील कंपनी आणि स्टील कॉर्पोरेशन ऑफ बेंगॉल ह्या कंपन्यांनीं आपले कारखाने वाढविण्यासाठी आणि त्यांत आधुनिक यंत्रसामग्री बसविण्यासाठी हिंदुस्थान सरकारकडे अनुक्रमें २० कोटी आणि १७ कोटी रुपयांचीं कर्जें मागितलीं आहेत. ह्या कंपन्यांचे प्रस्तुत प्रकरणासंबंधींचे अहवाल सरकारच्या उद्योग आणि पुरवठा खात्याकडे पाठविण्यांत आले आहेत. टाटा कंपनीचें असें म्हणणें आहे कीं, त्यांनीं सुचविलेली योजना अंमलांत आणली तर दरवर्षी ६ लाख टन अधिक पोलादाची निर्मिती कंपनी करूं शकेल. ही उत्पादन वाढ होण्यास तीन ते पांच वर्षांचा काळ लागेल. बंगाल स्टील कॉर्पोरेशनची योजना अंमलांत आल्यावर, योजनेच्या पहिल्या भागाच्या शेवटीं कंपनीचें उत्पादन दरवर्षी ३ लाख टनांनीं वाढेल. ही योजना पूर्ण होण्यास सहा वर्षें लागतील.

**मध्यप्रांतासाठी रशिअन खत**—मध्यप्रांत सरकारनें हिंदुस्थान सरकारच्या मार्फत ५,४०० टन सल्फेट ऑफ अमोनिआ हें खत रशिआकडून मिळविलें आहे. ह्या खताचा उपयोग अन्नधान्याच्या उत्पादनासाठी व्हावयाचा आहे. खताचा पुरवठा हिंदुस्थानांत लवकरच येणार आहे. खत सरकारला पडलेल्या किंमतीपेक्षां १२½ टक्के स्वस्त दरानें शेतकऱ्यांना विकण्यांत येणार आहे. शेतकऱ्यांनीं खताची किंमत रोख द्यावयाची आहे., किंवा तगाई कर्जांतून द्यावयाची आहे.

**लेबर एक्स्चेंजनें गांठलेला उच्चांक**—हिंद सरकारच्या मजूर खात्याच्या नोकऱ्या देणाऱ्या संस्थेनें जून, १९४८ मध्यें गेल्या तीन वर्षांतील नोकऱ्या दिल्याच्या मासिक संख्येचा उच्चांक गांठला आहे. हिंदुस्थानांत अशा ५४ संस्था आहेत. त्यांनीं गेल्या जून मध्यें २५,३७९ लोकांना नोकऱ्या लावून दिल्या. त्यांत स्त्रिया व पुरुष ह्या दोघांचाही समावेश होतो. पुनर्वसाहत आणि नोकरी खात्याची स्थापना झाल्यापासून एकूण ३,९३,८२४ लोकांना नोकऱ्या पुरविण्यांत आल्या आहेत.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, हमदेरे बोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. ४ ऑगस्ट १९४८


संस्थापक

संपादक : श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.

प्रो. वा. गो. काळे


## रिझर्व्ह बँकेचा वार्षिक अहवाल

### शेड्यूल्ड बँकांच्या शाखांत घट

३० जून, १९४८ अखेर संपलेल्या वर्षी रिझर्व्ह बँकेनें पांच बँकांना शेड्यूलमध्यें दाखल करून घेतलें व तीन बँकांना शेड्यूलमधून काढून टाकलें. अशा रीतीनें, शेड्यूल्ड बँकांची संख्या ९७ ची ९९ झाली. शेड्यूल्ड बँकांच्या एकूण कचेऱ्यांची व शाखांची संख्या वर्षाचे आरंभीं ३,५६६ होती. तींत ७६ नें घट होऊन त्यांची संख्या वर्षअखेर ३,४९० वर आली. अशा रीतीनें, बँकांच्या शाखा वाढीच्या प्रवृत्तीस आळा बसला आहे, इतकेंच नव्हे तर शाखांची संख्या कमीच होत चालली आहे.

### ठेवींत व कर्जांत वाढ

शेड्यूल्ड बँकांजवळील ठेवींत बरीच वाढ झालेली दिसून येते. जून, १९४७ अखेर त्यांचेजवळ एकूण १०१३¾ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या, त्या आतां १११९ कोटी रुपयांच्या झाल्या आहेत. म्हणजे, शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींत सुमारें ९७ कोटींची भर पडली आहे. सरकारनें नियंत्रणें दूर करण्याचें धोरण अवलंबिलें, त्याचें प्रतिबिंब बँकांनीं दिलेल्या कर्जावर पडणें स्वाभाविकच होतें. ५ डिसेंबर १९४७ रोजीं, बँकांनीं दिलेल्या कर्जांची रकम ४०४ कोटी रुपये होती, ती वर्षअखेर ४६८¾ कोटी रुपये झाली. अहवालाचे वर्षी रिझर्व्ह बँकेनें १२ बँकांना मिळून एकूण २¾ कोटी रुपयांचीं कर्जे दिलीं.

### लहान बँकांच्या ठेवींत मोठी घट

बिगर-शेड्यूल्ड बँकांची संख्या १९४६ अखेर ६५९ होती ती १९४७ अखेर ६८५ झाली. म्हणजे, त्यांच्या संख्येंत २६ ची भर पडली. ह्या बँकांची संख्या वाढली, तरी सुद्धां त्यांचे जवळील ठेवींत घटच झाली; त्या ७८¾ कोटी रुपयांवरून ४५¾ कोटी रुपयांवर आल्या. ३३ कोटींच्या ह्या मोठ्या घटीचें कारण अंशतः देशांतील कांहीं विभागांतील अशांततेचें वातावरण हें असलें पाहिजे, असें रिझर्व्ह बँकेच्या अहवालांत म्हटलें आहे.

### नियोजित राष्ट्रीयीकरणाचा परिणाम

रिझर्व्ह बँक ही सरकारी मालकीची करण्यांत यावयाची आहे. त्या दृष्टीनें आवश्यक ती कायद्याची योजना करावी लागेल. बँक आज भागीदारांच्या मालकीची आहे. ती उद्यां सरकारी झाली तरी, म्हणजे मालकी बदलली तरी, बँकेचे मामुली व्यवहार सध्यां प्रमाणेंच चालू रहातील, अशा धोरणानेंच राष्ट्रीयीकरणाची योजना आखण्यांत येत आहे.

### धान्याच्या आयातीसाठी स्टर्लिंगचा विनियोग

हिंदुस्थानास मोठ्या प्रमाणावर अन्नधान्याची आयात करावी लागली. त्यासाठी परदेशांना पैसे देण्याकरितां आपली इंग्लंडमधील साठलेली स्टर्लिंगची कांहीं शिल्लक मोडावी लागली. त्यामुळें, रिझर्व्ह बँकेचें पौंड-स्टर्लिंगमधील येणें अहवालाचे वर्षी २९¾ कोटी रुपयांनीं उतरलें आणि तें आतां १५३६¾ कोटी रुपये आहे.

### बँकेच्या नफ्यांत पाकिस्तानचा हिस्सा

रिझर्व्ह बँकेस अहवालाचे वर्षी १०,१८,२८,४२८ रु. निव्वळ नफा झाला. १९४३ च्या ऑर्डिनन्सनें ठरवून टाकलेला, रिझर्व्ह बँकेच्या डिव्हिडंडचा कमाल दर ४% आहे. ह्या दरानें ५ कोटी रुपये भांडवलावर डिव्हिडंड देण्यास २०,००,००० रुपये लागले. उरलेले १०,१८,२८,४२८ रुपये हिंदुस्थान सरकारकडे तूर्त वर्ग होतील. सरकारास मिळावयाच्या ह्या रकमेंत पाकिस्तानचा वाटा आहे. पाकिस्तान (मोनेटरी सिस्टिम अँड रिझर्व्ह बँक) ऑर्डरनें ही वाटणी कशी करावयाची, हें ठरवून दिलेलें आहे. ३० जून १९४८ रोजींच्या प्रसृत पाकिस्तानी नोटा व पाकिस्तानांतून हिंदुस्थानांत १ जुलै नंतर एका वर्षांत परतणाऱ्या हिंदी नोटा ह्यांचें एकूण हिंदी व पाकिस्तानी नोटा ह्यांचेशीं जें प्रमाण आढळून येईल, त्यावर ही वाटणी आधारलेली आहे. तेव्हां, वाटणीचे निश्चित आकडे आज सांगतां येणें शक्य नाहीं.

—x—

### टाटा स्टील डिव्हिडंड

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या भागीदारांस ३१ मार्च, १९४८ अखेरच्या वर्षाकरिता सुचवावयाच्या डिव्हिडंडचे दर डायरेक्टरांनीं जाहीर केले आहेत. ऑर्डिनरीवर १४ रु. आणि डिफर्डवर ६४ रु. १५ आ. मिळावयाचे आहेत. दोन्ही करमाफ आहेत. गेल्या वर्षीचें डिव्हिडंड अनुक्रमें १९ रु. व १०० रु. १३ आ. ४ पै होतें. १९४०-४१ सालीं तें सर्वांत ज्यास्त म्हणजे अनुक्रमें २९ रु. व १७२ रु. १० आ. होतें. टाटा स्टीलच्या डिव्हिडंडचा तुलनात्मक तक्ता खालीं दिला आहे:—

| वर्ष | —डिव्हिडंडचा दर— | |
|---|---|---|
| | ऑर्डिनरी | डिफर्ड |
| १९३४-३५ | नाहीं | नाहीं |
| १९३५-३६ | ६-०-० | ७-८-० |
| १९३६-३७ | १०-०-० | ३६-२-६ |
| १९३७-३८ | १५-८-० | ७५-११-३ |
| १९३८-३९ | १८-०-० | ९३-१०-५ |
| १९३९-४० | २५-०-० | १४३-१४-७ |
| १९४०-४१ | २९-०-० | १७२-१०-० |
| १९४१-४२ | २७-०-० | १५८-४-४ |
| १९४२-४३ | २३-०-० | १२९-८-९ |
| १९४३-४४ | २३-०-० | १२९-८-९ |
| १९४४-४५ | २३-०-० | १२९-८-९ |
| १९४५-४६ | २३-०-० | १२९-८-९ |
| १९४६-४७ | १९-०-० | १००-१३-४ |
| १९४७-४८ (सुचविलेलें) | १४-०-० | ६४-१५-० |

# शेअरबाजारांतील सट्टेबाजीस आळा

## गुंतविणारांस प्रभावी संरक्षण मिळणार काय ?

### डॉ. पी. जे. थॉमस यांचा अहवाल.

( लेः—श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम. )

हिंदुस्थानांतील एकंदर शेअरबाजारांवर नियंत्रण घालून शेअर्सच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा आणण्याच्या दृष्टीनें सरकारनें डॉ. थॉमस यांना पाहणी करून सूचना करण्यास नेमलें होतें. त्यांचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. शेअरबाजाराचा देशाच्या उद्योगधंद्याशी आणि नाणे बाजाराशी जिव्हाळ्याचा संबंध असल्यानें त्यावर कायद्याचें नियंत्रण असणें जरूर आहे, हें डॉ. थॉमस यांच्या अहवालाचें सूत्र आहे, व शेअरबाजारांत निष्कारण सरकारनें ढवळाढवळ करून भावांच्या हालचालींना अडथळा आणण्याचा प्रयत्न करूं नये हें तत्व डॉ. थॉमस यांना मान्य नाहीं. या दृष्टीनें डॉ. थॉमस यांनीं खालील महत्त्वाच्या सूचना केल्या आहेतः—

(१) सर्व शेअरबाजारावर व्यवहारांची पद्धत नियंत्रित करणारा मध्यवर्ति कायदा करणें.

(२) हा कायदा अमलांत आणणारी एक स्वतंत्र अधिकारपूर्ण संस्था स्थापणें. कारण, पुष्कळदा असे कायदे कागदावरच रहातात.

जो कायदा करावयाचा त्यामध्यें खालील गोष्टींचा अंतर्भाव असावा.

(१) मध्यवर्ति सरकारला शेअरबाजारांना परवाना देण्याचा अधिकार असावा. तसेंच जे हा व्यापार करूं इच्छितात त्यांच्यावरही परवान्याचें बंधन असावें.

(२) या संबंधीचे नियम व पोट नियम करण्याची मध्यवर्ति सरकारला सत्ता असावी.

(३) शेअरबाजारांत सौदे होणारे सर्व शेअर्स, सिक्युरिटीज या मध्यवर्ति दप्तरांत नोंदलेल्या असाव्यात व त्या त्या कंपन्यांनी वेळोंवेळीं सरकारला विशिष्ट माहिति पुरवली पाहिजे.

(४) बदला पद्धतीवर कडक नियंत्रण असावें.

(५) ब्लँक ट्रॅन्सफर्स व इतर "घातुक" व्यवहारावर नियंत्रण असावे.

(६) कायदा चालविण्याकरतां योग्य मंडळ असावें.

(७) सौदा करण्यापूर्वी वेळोंवेळीं 'मार्जिन' घेण्यांत यावें.

(८) दलालांच्या वह्या तपासण्याचा अधिकार असावा व त्यांची पैशाची परिस्थिति तपासावी.

(९) दलालांच्या व्यवहाराबद्दल खुलासा मागवावा.

(१०) स्टॉक्स व शेअर्सवर विक्रीकर बसवावा.

इतर सूचनांत, एकाच गावांत दोन शेअरबाजार नसावेत, रस्त्यावर सौदे करूं देऊं नयेत व अधिकृत बाजाराखेरीज इतरांना सौदे करण्याची परवानगी असूं नये, हा व्यवहार करणारी संस्था जॉईंट स्टॉक असण्याची जरूर नाहीं, सर्व बाजारांचा दैनंदिन कारभार एकाच पद्धतीवर चालावा व कारभार करणाऱ्या त्या त्या संस्थेवर बाजाराबाहेरील प्रतिनिधी असावा, बाजाराचा अध्यक्ष स्वतंत्र असावा, इत्यादि सूचना आहेत.

दैनंदिन व्यवहारासंबंधीं डॉ. थॉमस यांनी खालील सूचना केल्या आहेतः—

(१) कॅश अथवा रेडी डिलिव्हरी कॉंट्रॅक्टची निःसंदिग्ध शब्दांत व्याख्या करून डिलिव्हरी किती दिवसांत देण्यांत आली पाहिजे याचे स्पष्ट नियम करावेत; आणि त्यांत अपवाद केव्हां करावयाचा याचा उल्लेख पाहिजे.

(२) ज्या शेअर्सचे बाजारांत सौदे करावयाचे त्या त्या शेअर्सवर, बाजारांत नांव दाखल करून घेण्याच्या दृष्टीनें कडक अटी असाव्यात.

(३) 'मार्जिन' सर्वांकडून घेतलें गेलें पाहिजे व तें किती घ्यावयाचें हें रिझर्व बँक व जी सार्वजनिक नियंत्रण करणारी संस्था असेल त्यांच्या सल्ल्यानें वेळोंवेळीं ठरवावें.

(४) 'ब्रोकर' व 'जॉबर' अर्थात 'निवळ दलाल' आणि 'निवळ तारवणीवाले' असा फरक ठेवण्याचें जरी कारण नसलें तरी दलालानें स्वतःच्या गिऱ्हाईकाशीं प्रमुख ( प्रिन्सिपल ) म्हणून धंदा करतां कामा नये.

(५) दलाली ठराविक दरानें आकाराली गेली पाहिजे.

(६) बाजाराचे सभासद होण्यापूर्वी ठराविक काल शिक्षण व उमेदवारी केली गेली पाहिजे. याकरतां युनिव्हर्सिटींची एकादी पदवी ठेवावी.

(७) सुट्यांचे दिवस कमी करावेत.

(८) प्रत्येक बाजाराचें स्वतंत्र क्लिअरिंग हौस असावें.

(९) ब्लँक ट्रन्सफर्स फिरत राहणें घातुक असलें तरी त्यांच्या फिरतीस दोन महिन्यांची प्रथम मर्यादा असावी व कालांतरानें ती कमी करावी.

(१०) नवीन शेअर्स काढण्याचे वेळीं योग्य दक्षता घेतली जाण्याचे दृष्टीनें कंपनी कायद्यांत कलमें असावींत. तसेंच कंपनी डायरेक्टर्स व ऑफिसर्स यांच्या शेअर्स घेण्या-देण्यावर नजर असावी.

(११) कायदा करून अमलांत आणण्यासंबंधीचा खर्च परवानें फी व विक्रीकर बसवून भागवावा व याचें उत्पन्न प्रांतिक सरकारला मिळावें.

सरकारजवळ सुबुद्ध रीतीनें नियंत्रण करण्याच्या दृष्टीनें माणसें नाहींत अशी जी टीका केली जाते त्याला डॉ. थॉमस यांनीं युनाटेड स्टेटस् मधील 'सिक्युरिटीज अँड एक्सचेंज कमिशन' च्या सुव्यवस्थित कामाकडे बोट दाखवून ही टीका निराधार आहे असें मत प्रदर्शित केलें आहे. तसेंच नियंत्रणामुळें व्यापारधंद्याचे प्रगतीस अडथळा निर्माण होईल या टीकेस त्यांनीं 'जपानची आपल्याचप्रमाणें परिस्थिति असतांना जपाननें सुरवातीसच शेअरबाजारावर नियंत्रण घातलें व जपानच्या औद्योगिक प्रगतीस त्यामुळें कोठेंही अडथळा आला नाहीं' असें स्पष्ट उत्तर दिलेलें आहे. उलट, सुसूत्र व सुव्यवस्थित शेअरबाजारांची उद्योगधंद्यांना विशेष जरूर आहे असेंही प्रतिपादन केलें आहे. इतर देशांतही बाजारावर सरकारी नियंत्रणें आहेत."

आतापर्यंत शेअरबाजारामुळें देवघेवी अप्रतिहत होत आलेल्या असल्या तरी कोठल्याही शेअरबाजाराच्या अधिकाऱ्यांनीं भावांचा वाजवीपणा, त्यांतील अचानक उलथापालथ, सट्टेबाजी, निरपराध गुंतविणाराची त्यामुळें होणारी कत्तल, या गोष्टींकडे विशेष

लक्ष पुरविलें आहे असें म्हणतां येत नाहीं. याच सट्टेबाजीमुळें बँकांवरही अनेकदां गंडांतरें आलेलीं आहेत व चलन वाढीला उत्तेजन मिळालें आहे. ह्या गोष्टी टाळणें आवश्यक आहे. शेअर बाजारांत कर चुकवाचुकवी करण्यालाही भरपूर वाव मिळतो. सरकारचें अशा प्रकारें होणारें नुकसान टाळण्याकरतां नियंत्रणें बसविणें जरूर आहे. एकंदरीनें, उद्योगधंद्यांना भांडवलाचा पुरवठा व्यवस्थित रीतीनें व्हावा व गुंतविणाराला सुरक्षितता प्राप्त व्हावी असा या नियंत्रणाचा हेतु आहे.

डॉ. थॉमस यांच्या वरील सूचनांवर वेगवेगळीं मतें प्रदर्शित करण्यांत येत आहेत. मुंबई बाजाराचे अध्यक्ष श्री. श्रॉफ यांनीं "कायदा करणें सोपें आहे पण अमलांत आणणें कठीण आहे" असे उद्गार काढले. सर चुनीलाल भाईचंद मेहता यांनीं "एका गांवांत दोन बाजार असले तर त्यांत काय बिघडतें" अशी टीका केलेली आहे. अर्थात् सर चुनीलाल मुंबईच्या दुसऱ्या बाजाराचे अध्यक्ष आहेत हें लक्षांत घेतां ही टीका सहज समजते. शेअर बाजारांतील व्यवहारांची गुंतागुंत लक्षांत घेतां डॉ. थॉमसचा रिपोर्ट पोपटपंची केल्यासारखा आहे असें दलालगल्लींतल्या सर्वसाधारण सटोडियांना वाटतें. बहुतेक दलालांच्या मतें सूचना ठीक आहेत पण बदला पद्धति बंद करणें अशक्य आहे व ती बंद करण्याची जरूर नाहीं. आम्हीही याच्याशी सहमत आहोंत. कारण बदला नसला, तरी हजर भावांतही क्रांतिकारक फेरबदल होतात हें कलकत्ता व मद्रास "कॅश मार्केटस्" च्या अनुभवावरून दिसून येतें. विक्रीकराची सूचना मात्र निषिद्ध आहे. उठावें त्यानें कर बसवावा, असलाच हा प्रकार आहे. मध्यम स्थितींतल्या गुंतविणाराला त्यामुळें आणखी एका आपत्तीला तोंड द्यावें लागणार आहे. ब्लॅक-ट्रान्सफरस् ज्याअर्थीं कंपन्या रजिस्ट्रेशनला परमावधी लावतात त्याअर्थीं ब्लॅंक फिरत राहणें अपरिहार्य आहे. या कालावधीमुळेंच बदल्याची पुष्कळदा जरूरी उत्पन्न होते हें डॉ. थॉमस यांच्या लक्षांत आलेलें दिसत नाहीं. आम्हांला आणखी असें वाटतें कीं, भावांतल्या वेड्यावांकड्या हालचाली कितीही नियंत्रणें आणलीं तरी चालूं राहणारच. त्याला कारण नियंत्रणाचा अभाव हें नसून जागतिक व देशिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थिति हें होय. जोंवर ही परिस्थिति कोणी अटकावूं शकत नाहीं तोंपर्यंत हुशार डोक्याचे सटोडिये व आगाऊ माहिती काढणारे आणि ती फोडणारे सरकारी आणि कंपन्यांचे अधिकारी हे फायदा काढल्याखेरीज राहणार नाहींत. सरकारनें आठवड्याच्या डिलिव्हरींचें नियंत्रण घालूनही डिफर्ड १८०० ते ३६०० व पुन्हा १४५० होतो याचा अर्थ काय होतो? तेव्हां नियंत्रणांनीं नफा नुकसान काबूंत कितपत आणतां येईल याबद्दल आम्हाला शंका वाटते. शेअर बाजारांत वायदा मात्र कां असावा याची आम्हांस खात्री पटत नाहीं. त्यामुळेंच सट्टेबाजीला उत्तेजन मिळतें असें आमचें स्पष्ट मत आहे. वायद्याच्या शेअर्समध्यें होणारे व्यवहार व 'हजर' मध्यें होणारे व्यवहारांची संख्या ही पाहिली असतां आमच्या म्हणण्याची सत्यता पटेल. तेव्हां जरी 'कॅश' मार्केट केल्यानें चढउतार टाळता आले नाहींत तरी सट्टेबाजीला वाव कमी मिळेल असें वाटतें. 'मॅर्जिन' सुद्धां घेणें फारसें परिणामकारक ठरेल असें वाटत नाहीं. तें प्रत्यक्ष कुणी घ्यावयाचें? दलालानें कीं बाजारानें? व्यवहार करावयाचाच असें दलालानें ठरविल्यास तो कोणाचेंही 'मार्जिन' आहे म्हणून सांगूं शकेल. बाजाराला घ्यावयाचें तर सगळया जगाकडून 'मार्जिन' मागण्याचा प्रसंग यावयाचा. अशा अनेक रोजच्या व्यवहारांसंबंधीं अडचणी उत्पन्न होतील. मुंबई बाजाराचे अध्यक्ष श्री. श्रॉफ यांची टीका या दृष्टीनें यथार्थ आहे.

लोकसत्ताक राज्यपद्धतीसाठीं सर्वार्पण करण्यास तयार असणाऱ्या हिंदुस्थानांतील प्रजेला त्याच तत्त्वावर आधारलेली विमा कंपनीच खास आवडेल.

: त्यांतून स्वतःचा विमा उतरण्यासाठीं पश्चिम हिंदुस्थानांतील अग्रेसर :

दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी, लि.

ह्या कंपनीचीच निवड करणें योग्य होईल.

कारण

१९४७ अखेरचें

| | | |
|---|---|---|
| एकूण काम | ... | ३१,८४,००० चे वर |
| स्वीकारलेलें काम | ... | २८,८६,००० चे वर |
| पूर्ण झालेलें काम | ... | २४,६६,७५० चे वर |
| आयुर्विमा निधि | ... | ३,५९,६४८ चे वर |
| खर्चाचें प्रमाण | ... | १४·९ |

जास्त माहितीसाठीं लिहा अगर भेटा.

सेक्रेटरी,
त्र्यं. दा. देशपांडे,
बी. ए., एलएल. बी.

हेड ऑफिस :
८६६ सदाशिव, पुणें २.

मॅनेजर,
व. न. म्हैसूर,
एम. ए., एलएल. बी.

## स्टर्लिंग कर्जाची फेड

(प्रो. स. वा. कोगेकर)

हिंदुस्थानाच्या औद्योगिक उद्धारास भांडवली यंत्रसामुग्रीची आवश्यकता आहे. आपल्या येथें पौंडी शिलकांचा विनियोग ती मिळविण्याकडे कसा होईल, ह्या दृष्टीनेंच हिंदी विचारवंत त्यांकडे पहात आहेत. हिंदुस्थानास ग्रेटब्रिटनला पेन्शनसाठी दरसाल पैसे द्यावे लागतात, ते एका रकमेनें तोडून टाकण्याकडे एकूण येण्यापैकीं २२४ कोटी रुपये वळते करण्याचें ठरलें आहे, ही आश्चर्याची गोष्ट आहे. ह्याविषयीं कोणीहि तक्रार केली नाहीं, हें तर जास्तच आश्चर्यकारक आहे. पेन्शनची रकम दरसाल ६० वर्षें देत रहावयाची होती. केव्हांहि एका वर्षांत ८ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकम द्यावी लागली नसती. आपल्या सरकारच्या आर्थिक शक्तीच्या मानानें ही रकम कांहीं मोठी नाहीं. हिंदी औद्योगिक प्रगतीच्या मानानें, पेन्शनचें देणें एका रकमेनें वळतें करणें ही गोष्ट अगदी दुय्यम महत्त्वाची आहे. असें असतांहि निढळया घामानें निर्माण केलेल्या स्टर्लिंग येण्याचा मोठा भाग ह्या पेन्शनी रकमेनें खाऊन टाकला आहे. त्याचा परिणाम काय झाला आहे? हिंदी जनतेजवळ दरसाल जादा ८ कोटी रुपये रहातील आणि ती रकम जीवनोपयोगी वस्तूंवर खर्च होऊन जाईल. उत्पादक भांडवलांत भर मुळींच पडणार नाहीं. ह्या ८ कोटी रुपयांची बचत केली जाऊन तिचा विनियोग उत्पादक कार्याकडे केला जाण्याचा यत्किंचितूहि संभव नाहीं.

## विम्यांच्या धंद्यांतील घट

हिंदी विमा-कंपन्यांचा १९४८ मधील नवा धंदा १९४७ च्या मानानें बराच घटणार, अशीं चिन्हें दिसत आहेत. विशेषत: आयुर्विम्याच्या धंद्यावर परिणाम झालेला दिसून येत आहे. कांहीं कंपन्यांना १९४७ सालच्या पहिल्या सहा महिन्यांत मिळविलेल्या कामाच्या निमपटीनेंही धंदा १९४८ च्या पहिल्या सहा महिन्यांत मिळवतां आलेला नाहीं. विम्याच्या इतर शाखांचा धंदाही १९४७ च्या मानानें फारसा उत्साहजनक रहाणार नाहीं, असा संभव आहे. एक-दोन कंपन्या सोडून पाकिस्तानांतील बहुतेक हिंदी विमा-कंपन्यांनीं आपला तेथील धंदा बंद केला आहे. पश्चिम पाकिस्तानांतून दरवर्षी सुमारें १० कोटी रुपयांचे नवें काम हिंदी आयुर्विमा कंपन्या मिळवत असत; ह्यावरून पश्चिम पाकिस्तानचें ह्या धंद्यांतील महत्त्व लक्षांत येईल. हिंदी सरकारच्या प्रदेशांतील राजकीय व आर्थिक अस्थिरतेमुळें आयुर्विम्याचा धंदा मंदावला आहे. विम्याच्या हप्त्यांत झालेली वाढ आणि लोकांच्या प्राप्तींत झालेली घट ह्यामुळें विमा प्रचारकांना नवीन विमेदारांचे मन वळविणें कठीण जाऊं लागलें आहे. युद्धकालांत आणि नंतरच्या दोन वर्षांत हिंदी विमा कंपन्या सिंगल प्रिमियम भरणाऱ्या विमापत्रकांचा धंदा मोठ्या प्रमाणावर मिळवूं शकत असत. व्यापार-धंद्यांतील विमेच्छूंना अशा प्रकारच्या विमापत्रकांचें फार आकर्षण वाटत असे. तथापि, अलीकडे विम्याच्या हप्त्याबद्दल प्राप्तीवरील करासंबंधीं ज्या सवलती मिळत असत त्या कमी झाल्या आणि काळया बाजारांतील नफ्यालाही उतरती कळा लागली. ह्या दोन कारणांमुळें वरील प्रकारची विमा-पत्रकेंही आतां पूर्वी इतकीं दिलीं जात नाहींत. ह्या नैमित्तिक अडचणीशिवाय, वाढत्या खर्चाचा नेहमींचा प्रश्नही विमा-कंपन्यापुढें उभा आहेच.

**सुंठीचा व्यापार**—चीनमध्यें १० मलायी डॉलरला एक ह्याप्रमाणें सुंठी खरेदी करून त्या सिंगापुरला १,००० डॉलरला विकण्याचा व्यापार चालू असल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे.

## दि सुप्रीम म्युच्युअल ॲश्युअरन्स कंपनी लि. पुणें.

### अध्यक्ष, श्री. आठवले, ह्यांचें वार्षिक सभेंतील भाषण

पुणें येथील सुप्रीम म्युच्युअल ॲश्युअरन्स कंपनीची वार्षिक साधारण सभा ता. २४ जुलै रोजीं झाली. त्या प्रसंगीं कंपनीचे अध्यक्ष श्री. एस. पी. आठवले ह्यांनीं केलेल्या भाषणांतील महत्त्वाचा कांहीं भाग पुढें दिला आहे:—

"सध्या देशांत जी अनिश्चित परिस्थिती आहे, तीमुळें बऱ्याच क्षेत्रांत मंदी आलेली आहे. अर्थातच विमाकंपन्यांना आपला विस्तार व आपली संघटना हीं काळजीपूर्वक वाढवावी लागत आहेत. विमा संस्थांना—विशेषत: आयुर्विमा कंपन्यांना—दीर्घकालावर नजर देऊन योजना आखाव्या लागतात. विमा कंपन्यांच्या बाबत सरकारनें अद्याप आपलें धोरण निश्चितपणें आखलेलें नाहीं. हिंदी कायदेमंडळांत विम्याचें राष्ट्रीयीकरण करावें अशा मताचा एक जोरदार प्रवाह आहे. ह्याच्या उलट तितक्याच जोरानें राष्ट्रीयीकरण करूं नयें असाही एक पक्ष आहे. सरकारनें औद्योगिक धोरणाबाबत नुकतीच जी घोषणा केली, तींत विमा कंपन्यांचा उल्लेख नाहीं. अशा परिस्थितींत सरकार कोणतें धोरण स्वीकारणार ह्याची विमा कंपन्यांना खात्री वाटत नाहीं. सरकारनें विमा कंपन्यांना विश्वासांत घेऊन तज्ज्ञांच्या सल्ल्यानें धोरण ठरवावें अशी माझी विनंति आहे.

### अनुकूल सरकारी धोरणाची आवश्यकता


"गेल्या कांहीं महिन्यांत बँकांनी आपले व्याजाचे दर वाढविले आहेत. सरकारनें नुकतेंच ३½ टक्के व्याजाच्या दराचें कर्ज काढलें. त्यावरून स्वस्त व्याजाचा दर ठेवण्याचें सरकारचें पैसा विषयक धोरण बदललेलें दिसत नाहीं. सरकारच्या ह्या धोरणामागाचीं कारणें कांहींहि असोत, पण हें धोरण ठरवितांना ज्या संस्था मोठाल्या रकमा सरकारी रोख्यांत गुंतवितात त्यांच्या परिस्थितीचा सरकारनें विचार केलेला दिसत नाहीं. विमा कंपन्यांच्यावर पैसे गुंतविण्यासंबंधीं जीं बंधनें आहेत तीं आणि सरकारचे पैसा विषयक धोरण, ह्यामुळें विमा कंपन्यांची परिस्थिती अवघड होऊन बसली आहे. सध्याची स्थिती लक्षांत घेतां, विमा कंपन्यांना आपले हप्त्यांचे दर वाढविणें जरूर झालें आहे. सरकारच्या विमा अधिकाऱ्यांचेंही असेंच मत असावें असें वाटतें. प्रचलित परिस्थितीमुळें सामान्य माणसाला विम्यासंबंधीं आकर्षण वाटेनासें झालें आहे. त्यामुळें विमा कंपन्या आपले हप्ते वाढविण्यास स्वेच्छेनें कशा तयार होतील, हा एक प्रश्नच आहे. सरकारला पैशाबाबत सध्याचेंच धोरण चालवावयाचें असेल तर विमा कंपन्यांवर आकारण्यांत येणाऱ्या कराच्या दरांत बरीच सवलत दिली पाहिजे. ह्या सर्व बाबी ध्यानांत घेऊन सरकार विम्याबाबत आपलें नवें धोरण ठरवील, अशी आशा मी करतों.


### कंपन्यांचें एकमेकाशीं सहकार्य

"सरकारनें विमा कायदा दुरुस्त करण्यासंबंधींचें दुसरें बिल परत घेतलें आहे. त्यापेक्षां अधिक सर्वसंग्राहक बिल आणण्याचा सरकारचा विचार आहे. हें नवें बिल मंजूर करतांना सरकार सर्व बाजूंनीं विचार करील आणि विमा-कायद्याच्या अंमलबजावणीचा १० वर्षांचा अनुभव लक्षांत घेईल अशी आशा आहे. तथापि, सरकारच्या कायद्याची केवळ वाट पहात बसूं नये. स्वीडनमध्यें विमा-कंपन्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याची भीति उत्पन्न झाली, त्यावेळीं तेथील कंपन्यांनीं आपसांत सहकार्य करून आपल्या धंद्यांतील वैगुण्यें काढून टाकलीं. त्यामुळें राष्ट्रीयीकरण मागें पडलें. हिंदी विमा कंपन्यांनींही असेंच सहकार्य करावें अशी मी त्यांना विनंति करतो."

**किर्लोस्कर ऑइल इंजिन्स, लि.**

खडकी येथील कारखान्याच्या इमारतींचें चालू बांधकाम ( एप्रिल, १९४८ )





**तागाचा पुरवठा करण्याचें आश्वासन**—हिंदमधील गिरण्यांना लागणाऱ्या कच्च्या तागाचे पुरवठ्यांत कोणतीही अडचण निर्माण केली जाणार नाहीं, असें आश्वासन पूर्व बंगालच्या व्यापारमंत्र्यांनीं कलकत्त्याच्या तागाच्या व्यापाऱ्यांना दिलें आहे. तागाच्या निर्यात व्यापारासाठीं परवाना पद्धत सुरू करण्याचा सरकार विचार करीत असल्याचेंही त्यांनीं सांगितलें. हिंदला ५० लाख व इतर राष्ट्रांना २० लाख गाठी कच्चा ताग देण्याचे करार पूर्व बंगालनें केले आहेत; परंतु त्यानंतर तागाच्या पिकाचें बरेंच नुकसान झाल्यानें हा पुरवठा करणें कठीण झालें असल्याचें त्यांनीं कबूल केलें.

**दक्षिणी संस्थानांना कुळकायदा लागू**—मुंबई सरकारनें प्रांतांतील कुळ कायदा दक्षिणेंतील विलीन झालेल्या १६ संस्थानांना ता. २० जुलै, १९४८ पासून लागू केला आहे, असें समजतें.

**सीलोनमध्यें इटालिअन बोलपटतज्ज्ञ**—सीलोनच्या सरकारनें दरमहा १,५०० रुपये पगारावर एका इटालिअन बोलपट तज्ज्ञाची नेमणूक केली आहे. ह्या तज्ज्ञाकडे सरकारतर्फे चालविण्यांत येणाऱ्या बोलपट--निर्मितीच्या केंद्राचें काम सोपविण्यत आलें आहे.

**रशिआंतलि सोन्याचें उत्पादन**—सध्यां अमेरिकन सरकारच्या कोषाधिकाऱ्यांना, रशिआचें सोन्याचें उत्पादन अतोनात वाढून त्यामुळें जगांत सोन्याच्या बाजारपेठेंत गोंधळ उडेल अशी भीति वाटत आहे. सोव्हिएट रशिआंत निघणारें सोनें हल्लीं बाजारपेठेंत येऊं लागलें आहे. आमस्टरडॅम ( हॉलंड ) येथील व्यापाऱ्यांनीं कांहीं दिवसांपूर्वी रशिअन सोनें विकत घेतल्याचें वृत्त आहे. आज सोव्हिएट रशिआंतून सोनें मोठ्या प्रमाणावर निर्यात केलें जात नसलें, तरी रशियांतील सोन्याचें उत्पादन दरमहिना १० लाख औंस असावें असा अंदाज आहे. ह्याशिवाय, पॅसिफिक समुद्राच्या किनाऱ्यावर आणि आशिआंतर्गत रशियांत नवीन सोन्याच्या खाणींचाही शोध लागला आहे.

**पश्चिम बंगालसाठी जादा तांदूळ**—नवी दिल्ली येथें प्रांतिक सरकारांच्या नागरी पुरवठा खात्यांच्या चिटणिसांची जी परिषद भरली होती, तिनें पश्चिम बंगालसाठी ५० हजार टन तांदूळ अधिक देण्याचें ठरविलें आहे असें कळतें.

**हॉलंडला कर्ज**—आगबोटी विकत घेण्यासाठी हॉलंडला जागतिक बँकेकडून कर्ज दिलें जाण्याची घोषणा लवकरच होईल. ही कर्जाची रकम १ कोटी, ५० लाख डॉलर्सच्या आसपास असावी, असा अंदाज आहे.

**पाकिस्तान-जर्मनी व्यापार**—पाकिस्तान आणि जर्मनी ह्यांच्यांतील व्यापाराच्या वृद्धीची शक्यता अजमावण्यासाठी पाकिस्तान सरकारनें आपल्या देशांतील व्यापाऱ्यांच्या माहितीसाठी एक योजना प्रसृत केली आहे.

**हाडांची बँक**—पाश्चात्य वैद्यकशास्त्रांत रक्ताच्या बँकेप्रमाणेंच हाडांचीही बँक आतां होऊं लागली आहे. अपघातांत अगर इतर कारणानें रक्तस्राव फार झाल्यास माणसाला रक्तदान करण्यांत येतें व तेवढ्यामुळें माणूस पुष्कळदा वाचूं शकतो. न्यूयॉर्क शहरांत रक्ताप्रमाणेंच हाडांच्याही सहा बँका आतां स्थापन करण्यांत आल्या आहेत. ह्या प्रकारच्या बँकांच्या उपयुक्ततेसंबंधीं डॉ. ह्रेट ह्या तज्ज्ञाचें न्यूयॉर्क रेडिओवर नुकतेंच भाषण झालें.

## रिझर्व्ह बँकेच्या राष्ट्रीयीकरणानंतर

### शेअर्सबद्दल नुकसानभरपाई सढळपणें द्या.

"रिझर्व्ह बँकेवर नियंत्रण ठेवण्याचा व तिच्या कारभारांत हस्तक्षेप करण्याचा व्यापक अधिकार आजहि हिंदुस्थान सरकारास आहे. तेव्हां, बँकेचें राष्ट्रीयीकरण अनावश्यक आहे. बँकेच्या भागीदारांचे शेअर्स सरकारनें कोणत्या किंमतींत खरेदी करावे, ह्याविषयक अर्थमंत्र्यांची घोषणा असमाधानकारक आहे. मार्च, १९४७ ते फेब्रुवारी, १९४८ ह्या मुदतीमधील शेअर्सच्या मासिक किंमतीची सरासरी काढून तेवढ्या किंमतीचे ३% दराचे सरकारी रोखे भागीदारांना देऊं करण्यांत यावयाचे आहेत. परंतु वरील मुदतींतच लियाकतअल्लींच्या करविषयक योजनेमुळें शेअर्सचे भाव घसरले, ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. आपल्या राष्ट्रीय सरकारच्या राष्ट्रीयीकरणाच्या धोरणाचा रिझर्व्ह बँकेबाबत पहिला प्रयोग होत आहे; तेव्हां भागीदारांना द्यावयाच्या नुकसानभरपाईसंबंधीं गुंतविणाऱ्या जनतेंत विश्वास निर्माण करण्यासहि हीच संधी आहे." रिझर्व्ह बँकेच्या भागीदारांनीं मुंबई येथें सभा भरवून व्यक्त केलेली मागणी.

---

**संपामुळें कामाची हानि**—जून महिन्यांत झालेल्या संपांमुळें मुंबईतील कामगारांचे ८६,१२० दिवस फुकट गेले. मे महिन्यांत १,७९,८०१ दिवस संपामुळें वाया गेले होते. संपांची संख्या दोन्ही महिन्यांत मिळून ७२ झाली. गेल्या सालीं जूनमध्यें झालेल्या संपांत ३७,३६८ कामगार सामील झाले होते. ह्या सालच्या जून महिन्यांतील हा आंकडा ३९,८०२ इतका आहे.

---

### पीपल्स कॉमनवेल्थ
### को-ऑपरेटिव्ह कॉलनायझेशन सोसायटी लिमिटेड.

# —अमृतनगर—

## विचारप्रवर्तक अशी कांहीं वैशिष्ट्यें

—अवजड अशा पाश्चात्य पद्धतीच्या नगररचनेची नक्कल नाहीं.

—मानवजीवन विकासास अपकारक अशा स्वैरवर्तनाला, नफेबाजीला तसेच रुग्णशुश्रुषा, ज्ञानदान व स्वास्थ्य संरक्षण या समाजकार्यांतील बुद्धिवंतांच्या काळ्याबाजाराला अनुकूल परिस्थिती ठेवावयाची नाहीं.

—स्वधर्म, शेजारधर्म व समाजधर्म यांच्या पालनांतून मानवधर्माची ओळख पटवून देण्याचें कार्य हें शिक्षणक्रमांतील महत्त्वाचें राहील.

—सर्व जनता सुबुद्ध, स्वावलंबी, स्वयंप्रकाशित, संघटित व सामर्थ्यवान व्हावी व रहावी यासाठीं बालजीवन, युवकजीवन, प्रौढ स्त्री-पुरुषांचे कौटुंबिक जीवन आदर्श करण्याच्या दृष्टीनें योजनेंतील कामांचा विचार होणार आहे.

—जनतेला झेपतील, पचतील व मानवतील अशा मार्गांनीच योजनेंतील कामें पार पाडण्यासाठीं तपशिलाचा विचार विशेष बारकाईनें होईल.

यासंबंधीं विशेष विवेचन "अमृतनगर" च्या पाक्षिक पत्रकाच्या द्वारें सोसायटीच्या सभासदांच्याकडे नियमितपणें पाठविण्याचें योजलें आहे. तरी याबद्दल आस्था असणारांनीं सोसायटीचे सभासद होऊन कार्यास हातभार लावावा.

परमेश्वरकृपेनें जमिनीच्या मालकांचीही समजूत पटून त्यांच्याकडून आपलेपणानें सहकार्य होण्यास सुरवात आतां झाली आहे हे शुभचिन्ह, आहे.

२८२ सदाशिव पेठ
पुणें २. १६-७-४८

**शंकर रामचंद्र भागवत**
मॅनेजिंग डायरेक्टर





# दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

**हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.**

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

**शं. न. आगाशे**
मॅनेजिंग डायरेक्टर








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
श्री. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजिनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.